स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 11–12–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 2. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 282:– प्रभाग क्र जुना ६ ( नविन प्रभाग क्र. १) मधील जरिपटका {लोककर्म झोन 10} येथिल प्रोटेटीयन कब्रस्थान येथे पायवाट, शौचालय व टिन शेड तयार करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. जानव्ही इन्टरप्रॉइजेस यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा ११% कमी दराची राशी रू. ३८,११,१९७/– (अडतीस लक्ष अकरा हजार एकशे सत्यानऊ फक्त ) रकमेची निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 283:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. २२ ड अंतर्गत येथे रामपेठ परिसरात बालाजी स्टील ते रचना कॉम्प्लेक्स पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.४४,८१,६४३/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 284:— {लोककर्म झोन 04} नागपूर महानगरपालिका अंदाजपत्रक धोरणाचे अनुषंगाने गांधीसागर तलावाचे पश्चिम भागात खाऊ गल्ली अंतर्गत तयार करण्यात आलेल्या 32 स्टॉलचे (Canopy) चे 16 खाद्य/पेय पदार्थकरिता प्रत्येकी 2 स्टॉल याप्रमाणे एक स्टॉलकरिता कमीतकमी रु. 10,000/— इतका प्रतिमाह किराया शुल्क व रु. 10,000/— प्रतिमाह देखभाल शुल्कप्रमाणे व्यक्ती वा संस्था यांचेकडून मनपाद्वारे निर्धारित रक्कमेपेक्षा सर्वात जास्त देकार देणाऱ्या व्यक्ती व संस्थेचा प्रतिमाह किराया दरानुसार स्टॉलचा किराया निश्चित करण्याबाबतचा रुचीदर्शक प्रस्ताव (EOI) मागविण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अल्प वेळाच्या मुदतीचा रूची दर्शक प्रस्ताव मागविण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 285:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 23 ब त्रिमुर्तीनगर येथे श्री झाम ते श्री गुप्ता यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे काम करण्यास्तव रु 49,78,558/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच सदर कामाकरीता मा.अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून रु. 49,78,558/— राशीची तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 286:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 32 ब येथील सतनामीनगर येथे 1) भुखंड क्र. 103 ते 116 व 2) मस्जीद ते श्री गुडधाने यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे कामा करीता वाढीव कार्यादेश 49,27,000/— रकमेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर्हु काम हे महानगर पालिका क्षेत्रातील प्राथमिक सोयी सुविधांचा विकास या कामाकरीता विषेश शासकीय निधीतून आर्थिक वर्ष 2016 —2017 मध्ये 49,97,700/— राशिला प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. या कामाकरीता मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांना प्राकलनिय दराच्या 11.9 टक्के कमी दराप्रमाणे रु. 44,02,974/— चा कार्यादेश दिलेला होता. मा. आमदार पुर्व नागपूर यांचे निर्देशाप्रमाणे मौक्यावर वाढीव काम करावे लागल्याने वाढीव कामाची रक्कम रु. 5,94,726/— इतकी आहे. वाढिव कामाच्या रकमेप्रमाणे एकूण कामाची कार्यादेश रक्कम अंदाजे 49,27,000/— इतकी राहील. ती रक्कम या कामाकरीता मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या रकमेच्या आत आहे. तसेच कंत्राटदारानी निविदेतील मंजूर दराप्रमाणे काम करण्यास सहमती दिलेली होती.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 287:— {कार्य.अभिंयता प्रकल्प} अंबाझरी ओव्हरफ्लो पॉईंट येथील स्वामी विवेकानंद स्मारकाचे सौदर्यीकरण व विकासाचे काम पूर्णत्वास आहे. या कामात स्मारकाचे सौदर्यीकरण करण्याकरीता विविध प्रकारचे काम घेण्यात आले आहे. याच प्रकल्पाचा एक भाग म्हणून विषयांकित काम करारनामा क्र. 108/EE/(P) दि. 03.10.2016 अन्वये

मे. श्याम सिरॅमिक यांना प्रदान करण्यात आलेले आहे. सदर स्मारक आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे व नागपूरात पर्यटनाचा वाव वाढावा याकरीता यापूर्वी तयार करण्यात आलेल्या प्राकलनात रिटेनिंग वॉलला स्टॅम्प कॉंक्रिट करणे ही सुधारीत बाब मंजुर करण्यात आली. त्यामुळे मुळ मंजुर प्राकलनिय किंमत रू. 4134002/– पेक्षा अधिक रू. 381002/– जास्त खर्च होणार आहेत व कंत्राटदार करारनाम्यातील किंमतीवर काम करण्यास तयार आहे.

करीता स्वामी विवेकानंद स्मारक येथील रिटेनिंग वॉलला स्टॅम्प कॉंक्रिट करण्याच्या कामात रू. 3,81,002/– चा वाढीव खर्च पद क्र. A 46701673520 या पदाअंतर्गत मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 288:– {लोककर्म झोन 01}

प्रभाग क्र. 38 'ब' अंतर्गत पारधी यांच्या घरापासुन ऑक्ट्राय पोस्ट पर्यन्त जयताळा मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४१,३२,९९१/– (एकेचाळीस लक्ष, बत्तीस हजार, नऊशे एक्यान्नव फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 289:– {लोककर्म झोन 03}

प्रभाग क्र. ४७ (जुने) व नविन प्रमाणे प्रभाग क्र. (३१) अंतर्गत गणेश नगर सुदर्शन धाम येथील अतिरिक्त स्थापत्य कामे व फॉऊन्टेनची कामे करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेल्या ई–निविदातील प्रथम निम्नतम निविदाकारांचे निविदा दर तक्त्यात खालील दर्शविल्या प्रमाणे प्राप्त झालेल्या आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदाकार | निविदा दर | निविदा राशी रू. |
|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य ठराव क कामे | मे. एन.एन. बेलखुडे | 0.9999%कमी | 20,80,363/– |
| २ | उद्यान ठराव क | | | |
| अ | खेळणी बसविणे | मे.एक्सल कायब्रेटीक प्रा. लि. | 0.50%कमी | 5,11,753/– |
| ब | फव्वारा बसविणे | मे.कृषिमित्रा एरिगेशन सर्विसेस | 0.56%कमी | 3,07,369/– |
| | | | एकूण | 28,99,485/– |

वरील तक्त्यानुसार प्रथम निम्नतम निविदाकारांचे निविदा दराच्या एकूण निविदा राशी रू. २८,९९,४८५/– रकमेच्या निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 290:– {लोककर्म झोन 6}

प्रभाग क्र. १९ ड अंतर्गत बजेरिया येथील प्रल्हादराय शिवनारायण अग्रवाल मार्गाचे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.१,०२,९५,८४९/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 291:– {उद्यान विभाग}

प्रभाग क्र.16 (ड) हिंदूस्तान कॉलनी येथील जगदीशचंद्र बोस बॉटनिकल आणी सायन्स टेक्नॉलॉजी उद्यान विकसीत करण्याकरिता विविध कामे करण्याचे रू. 49,88,063/– (अक्षरी एकोणपन्नास लक्ष अठठयांशी हजार त्रेसष्ट

रूपये फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामाच्या निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 292:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 24 (ब) डिप्टी सिग्नल साखरकरवाडी येथे मो. अनवर ते येरणे आणि मनिष कौसल ते उराडे यांचे घरापर्यंत सिमेंट रोडचे बांधकामास्तव रु. 31,46,920/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 293:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. जुना 8 ब (नविन प्रभाग क्र. 11 अ) अंतर्गत गोरेवाडा दहनघाटाचे बांधकामाचे कामास्तव प्राप्त एकुण 4 निविदाकारांच्या निविदापैकी प्रथम निम्नतम निविदाकार में. दिपेश कंस्ट्रशन यांचे निधन झाल्यामुळे त्यांचे निम्नतम निविदा (प्राकलनिय दरापेक्षा 11% कमी रू. 51,47,579/— )दरावर द्वितीय निम्नतम निविदाकार में. एन.एन. बेलखुडे यांचे कडून करून घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 294:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 38 'ब' अंतर्गत मौजा टाकळी सिम गांव येथे सिमेंट कॉक्रीट रस्त्यांचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. २९,९२,८६७/— (एकोनतीस लक्ष, ब्यान्नव हजार, आठशे सडुसस्ट फक्त) रकमेच्या प्राकलनास मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A42001374602 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 295:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 24, अ, ब आणि क डिप्टी सिंग्नल पुंजारामवाडी येथे सिमेंट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव रु. 44,99,832/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए22001330803 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 296:— {आरोग्य विभाग} मनपात आरोग्य विभागा अंतर्गत, 3596 नियमित आस्थापनेवरील सफाई कर्मचारी आणि 4460 ऐवजदार कर्मचारी असे एकूण 8056 सफाई कर्मचारी कार्यरत आहेत.

सदर कर्मचाऱ्यांना, प्रत्येकी 500 ते 900 मीटर दरम्यानचे 5096 बिट्स नेमूण दिले आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांने त्यांना नेमूण दिलेल्या बिट्समध्ये कार्यालयीन वेळेत 8 तास (भोजन विश्राम 1 तास धरून) काम करणे अपेक्षित आहे. तथापि बरेच कर्मचारी विनापरवानगीने सुटीवर जातात, खुप विलंबाने कामावर येतात, हजेरी झाल्यावर अगदी थोडावेळ काम करून कामाच्या ठिकाणाहून निघून जातात. अशा तक्रारी नागरीकांकडून तसेच सन्मानिय लोकप्रतिनिधीकडून येत असतात. या बांबीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपलब्ध यंत्रणा पूरेशी ठरत नाही. सफाई कर्मचाऱ्यांची मोठी संख्या लक्षात घेता या कामी Geo fencing a Tracking यंत्रणेद्वारे यावर नियंत्रण ठेवता येणे शक्य होईल. याकरिता भारत सरकारच्या सार्वजनिक उपक्रमाच्या ITI या कंपनीने प्रस्ताव सादर केलेला असून कंपनीने आशीनगर झोन क्र. 9 मधील निवडक कर्मचाऱ्यांवर डेमोदेखील दिलेला आहे. डेमोचे रिझल्ट व ॲनालासिसवरून हे स्पष्ट झाले की, कर्मचारी 45 टक्के काळ उपस्थित होते

मनपामध्ये Geo fencing व Tracking प्रणाली राबविल्यास सफाई कर्मचाऱ्यांवर खालील बाबींवर नियंत्रण ठेवता येईल.

1. कर्मचाऱ्याला नेमून दिलेला प्रत्येक बिट Geo fence करता येईल
2. संबंधीत बिटमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला घड्याळासारखे यंत्र मनगटावर बांधण्याकरिता देण्यात येईल.
3. सदर यंत्र GPRS व GPS दोन्ही प्रणालीवर काम करेल याचा वापर केल्यास संबंधीत कर्मचारी त्यांना नेमुन दिलेल्या बिटमध्ये कामावर गेल्यास तो जेव्हा केव्हा या बिटमध्ये म्हणजेच Geo fence Area मध्ये जाईल तेव्हा तो किती वाजता आला याची नोंद होईल. तसेच तो बिटमध्ये किती वेळ राहील व किती वेळासाठी बिट सोडून गेला याच्याही नोंदी होतील.
4. या नोंदीच्या आधारे कामगार किती वेळ कामावर होता हे स्पष्ट होईल.
5. या नोंदीच्या आधारे कामगारांचे वेतन अदायगी प्रणालीशी सदर प्रणाली (integrate) जोडता येईल.
6. एखाद्या कर्मचाऱ्यांने त्यांच्या ऐवजी दूसरा कोणी कर्मचारी कामावर पाठवला तर उक्त घडयाळ सदृश यंत्राला कंट्रोल रूम मधून कॉल दिल्यास संबंधित कर्मचारी घडयाळात असलेल्या कॅमेराद्वारे दिसून येईल आणि कर्मचाऱ्याच्या मूळ स्टॉक फोटोशी पडताळणी शक्य होईल.
7. सदर यंत्र पडत्या पावसातही चालू शकते.
8. सदर यंत्र उघडण्याचा किंवा खराब करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याचाही Alert कंट्रोल रूममध्ये येईल
9. एखाद्या कर्मचाऱ्याची तब्येत बिघडून नाडीचे ठोके अचानक वाढल्यास त्याहीबाबत कंट्रोल रूमला Alert येईल. व कर्मचाऱ्याला मदत पाठविणे शक्य होईल.
10. कर्मचाऱ्यास हजरीच्या ठिकाणी जाउन उपस्थिती दर्शउन बिटवर यावे लागते हा देखील वेळ वाचण्यास मदत होईल.

सदर कामाकरिता ITI कंपनीने यंत्र पुरवठा, अनुषंगिक Control Room अनुषंगिक Dash Board व त्याचे कर्मचारी या कामी नेमणे यासह म्हणजेच Opex Model वर प्रस्ताव सादर केला आहे. त्यासाठी त्यांनी प्रति कर्मचारी प्रतिमाह रू. 207 + GST दर आकारणी करण्याचे नमूद केले आहे. सुमारे 8000 कर्मचारी गृहीत धरल्यास प्रतिमाह रू. 16,56,000 /- व 18 टक्के दराने GST रू. 298080/- मिळून रू. 1954080 व वार्षिक खर्च रू. 2,34,48,960 येईल. त्यांनी 7 वर्षांचा करार अपेक्षित असून 3.5 वर्ष Lock in Period म्हणजे किमान 3.5 वर्षे काम मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

3.5 वर्षाचा खर्च रू 8,20,71,360 एवढा होईल

सद्य स्थितीत कामगारांचे वार्षीक वेतन एकूण रू. 72 कोटी व ऐवजदारांचे एकूण वेतन रू. 96 कोटी म्हणजे सर्व मिळून एकूण रू. 168 कोटी होतो. डेमोचे आकडे प्रतिनिधीक मानले तरी त्याच्या 55 टक्के i.e. रू. 92.40 वार्षिक एवढा अनुत्पादक खर्च होतो. अगदी त्याच्याही निम्ने 27 टक्के अनुत्पादक खर्च गृहीत धरला तर वार्षिक रू. 46.20 राशी होते. त्या तुलनेत उक्त यंत्रणा निर्माण केल्यास येणारा खर्च उचित मानता येईल.

भविष्यात मनपाचे वॉचमन NDS चे कर्मचारी इ.कर्मचाऱ्यांना देखिल गरजे प्रमाणे Geo fencing/Tracking खाली आणता येईल. तसेच सफाई कर्मचाऱ्यांना दिले जाणारे वेतन हे त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थिती कालावधी प्रमाणे केलेल्या कामाचे तासांवर आधारित असेल.

या कामाकरिता येणारा खर्च आरोग्य विभागाच्या व्यय पद क्र. A24001221905 (अस्वच्छता निर्मुलन दक्षता पथक प्रशासकिय व प्रवर्तन व्यय या अंतर्गत करण्यात येईल. या पदाअंतर्गत रू. 200 लक्ष चे प्रावधान असून अध्याप या पदाअंतर्गत खर्च करण्यात आलेला नाही.

ITI ही केंद्र शासनाची सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी असल्यामुळे त्यांचेशी करार करण्यास हरकत वाटत नाही. तथापि सदर काम देणे म्हणजे निविदा न मागवता काम देणे प्रकारातील असल्यामुळे त्यासाठी महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमानुसार सक्षम प्राधीकरण म्हणून स्थायी समितीची मान्यता आवश्यक असते.

करिता सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 297:— प्रभाग क्रमांक 13 (ड) येथिल दाभा चौक ते वायुसेना गेट या {लोककर्म झोन 02} रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाच्या रु. 34,56,585/— च्या प्राकलनास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 298:— प्रभाग क्र.2 (अ) (जुना 6—अ) अंतर्गत शिव मंदीर रोड, {लोककर्म झोन 09} श्रावस्ती नगर येथे सिमेंट काँक्रीट पेव्हमेंटचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास इंटरप्रायजेस यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 28,73,900/— पेक्षा 0.999 टक्के कमी दराची रु. 28,45,163/— ची निविदा स्विकृत करण्याचा तसेच, हे काम पद क्र. 370 (A22001330801) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सिमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 299:— नागपूर शहरातील, पावसाळयापुर्वी नाले सफाई करण्याकरीता, {कारखाना विभाग} झोननिहाय मुख्य रस्ते, हमरस्ते, रस्त्यालगत साठून राहीलेला बांधकाम साहित्य/कचरा/निरुपयोगी साहित्य यांची विल्हेवाट लावण्याकरीता तसेच स्वच्छ सर्वेक्षण अभियान करीता, उपलब्ध वाहने/मशिनरी अपुरी पडल्यास, वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याकरीता व्दिवार्षीक दरकरार करण्याकरीता ई—निविदा मागविण्याचे तसेच स्थायी समिती ठराव क्र. 633, दि. 21/10/2016 व मा. आयुक्त, यांच्या दि. 05/11/2016 रोजीच्या मंजूरी अन्वये, वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याच्या मंजुर दरकरारास नवीन व्दिवार्षीक दरकरार कार्यान्वीत होईपर्यत वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याच्या वार्षीक दरकरारास मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 300:— Model of Universal Primary Health Care in Nagpur City {आरोग्य विभाग} हा प्रकल्प नागपूर महानगरपालिका व टाटा ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरात राबविण्याबाबत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांनी देशातील ख्यातनाम उद्योगपती श्री.रतनजी टाटा, मुंबई यांना दिलेल्या पत्रा अनुषंगाने राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, नागपूर म.न.पा. अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बळकटी करण्यास्तव म.न.पा. सोबत रुची दर्शविल्यानुसार टाटा ट्रस्ट हि संस्था दवाखान्यातील सोयी सुविधा तांत्रिक बाबींचा उपयोग करुन उत्तम दर्जाची सेवा संयुक्त विद्यमाने पुरविणार आहे. तसेच टाटा ट्रस्ट चा उपरोक्त प्रकल्पात कोणताही व्यावसायीक उद्देश नाही. सदर उपक्रम टाटा ट्रस्ट स्वखर्चाने करणार असुन कोणताही आर्थीक भार म.न.पा.ला वहन करावा लागणार नाही. त्यानुसार टाटा ट्रस्ट कडुन २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. प्रथमतः ८ नागरी आरोग्य केंद्राचे बळकटीकरण करण्यात येऊन तद्नंतर टप्याटप्याने उर्वरित नागरी आरोग्य केंद्राचे बळकटीकरण करण्यात येईल. त्यानुसार टाटा ट्रस्ट कडुन २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प राबविण्याकरीता करारनाम्यातील प्रमुख अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत. तसेच इतर अटी

व शर्ती (मुद्दा क्र.१.१ ते १.४, मुद्दा क्र.२.१ ते २.१३, मुद्दा क्र.३.१ ते ३.११) नस्तीत (पृ.क्र.८२-८५ वर) उपलब्ध आहेत.

१) सदर प्रकल्प तीन वर्षाकरीता राबविण्यात येईल.

२) नागपूर म.न.पा. टाटा ट्रस्ट यांना कार्यालयीन कामाकरीता जागा, विद्युत व पाणी निशुल्क उपलब्ध करुन देईल.

३) टाटा ट्रस्ट हे 'सदर रोगनिदान केंद्र' येथे केंद्रीय प्रयोगशाळा स्थापन करतील. नागपूर म.न.पा. कडुन प्रयोगशाळेच्या जागेची डागडुजी करुन देण्यात देईल. या प्रयोगशाळेकरीता लागणारे मनुष्यबळ व इतर आवश्यक बाबींकरीता लागणारा खर्च टाटा ट्रस्ट करतील.

४) नागपूर म.न.पा. नागरी आरोग्य केंद्राकरीता लागणारे मनुष्यबळ, औषधी उपलब्ध करुन देईल व दवाखान्याचे आवश्यक नुतनीकरण करेल.

५) टाटा ट्रस्ट संगणकीकृत कार्यपध्दती व प्रशिक्षण हयाबाबत देखभाल करतील तसेच माहिती अद्यावत ठेवणे व सदर माहिती वेळोवेळी म.न.पा.स उपलब्ध करुन देतील.

६) टाटा ट्रस्ट प्रयोगशाळेत आकारण्यात येणारे शुल्क म.न.पा. दरानुसार आकारेल तसेच सुचीत दर उपलब्ध नसल्यास राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या ठरविलेल्या दरानुसार आकारण्यात येईल.

७) प्रयोगशाळेत जमा होणारा निधी म.न.पा. व टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये ५०-५०% विभागुन घेण्यात येईल.

८) टाटा ट्रस्ट यांना विभागुन देण्यात आलेला निधीचा उपयोग टाटा ट्रस्ट प्रयोगशाळेकरीता लागणाऱ्या घटकांवर खर्च करतील.

९) म.न.पा.कडुन सदर प्रकल्पाकरीता High Speed Internet Connection उपलब्ध करुन देण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 301:— स्थानिक संस्था कराचे प्राप्त विवरणपत्रांचे पडताळणी व
{स्थानिक संस्था कर} प्राथमिक निर्धारण करण्याचे कामाकरीता सहाय्यता करण्याचे मे.ए.एस.कुळकर्णी ॲन्ड असोसिएट्स यांचे कामास मुदतवाढ व आर्थिक मंजूरी प्रदान करणे तसेच,

मा. स्थायी समिती ठराव क्र.130 दिनांक 24.07.2015 चे मंजूरी अन्वये आर्थिक वर्ष 2013—14 व आर्थिक वर्ष 2014—15 मध्ये प्राप्त एकूण 42251 स्था.सं.कराचे विवरणपत्रांपैकी 20,000 प्रकरणांचे पडताळणी व प्राथमिक निर्धारण करण्याचे कामाकरीता सहाय्यता करण्याचे काम मे.ए.एस.कुळकर्णी ॲन्ड असोसिएट्स यांना विभागाचे कार्यादेश क्र. NMC/LBT/06/w.o. दिनांक 21.08.2015 अन्वये कार्यादेश प्रदान करण्यात आला व त्याबाबतचा करारनामा करण्यात आला आहे व त्यानुसार त्यांनी 20,000 प्रकरणांची पडताळणी करुन प्राथमिक निर्धारणाचे काम वेळेत पूर्ण केलेले आहे.

स्थानिक संस्था कर बंद झाला असला तरी स्था.सं.कर नियम 33(7) नुसार प्रत्येक आर्थिक वर्षात प्राप्त विवरणपत्रांचे निर्धारण पांच वर्षाचे आंत करणे म.न.पा.स बंधनकारक आहे. तसेच महालेखाकार (लेखापरिक्षा)—II महाराष्ट्र नागपूर यांचे पत्र क्र.LB-II/LBT/517 दिनांक 20.07.2017 अन्वये आर्थिक वर्ष 2013—14, 2014—15,2015—16 व 2016—17 चे प्राप्त विवरणपत्रांचे

निर्धारण पूर्ण करणे अनिवार्य असल्याने म्हणजे आर्थिक वर्ष 2013–14 करीता प्राप्त विवरणपत्रांचे निर्धारण मार्च – 2019, 2014–15 चे प्राप्त विवरणपत्रांचे निर्धारण मार्च–2020 व 2015–16 चे प्राप्त विवरणपत्रांचे निर्धारण मार्च–2021 पर्यंत करावयाचे आहे. मे.ए.एस.कुळकर्णी ॲन्ड असोसिएट्स यांचे व्दारे वरील कार्यादेशानुसार 2013–14 व 2014–15 या वर्षातील 20,000 प्रकरणांची पडताळणी व प्राथमिक निर्धारण झालेल्या प्रकरणांव्यतिरिक्त वर्ष 2013–14, 2014–15,2015–16 व 2016–17 मधील उर्वरीत प्रकरणांचे म्हणजे जवळपास 52,301 प्रकरणांचे काम कार्यादेश क्र. NMC/LBT/06/w.o. दिनांक 21.08.2015 च्या करारनाम्याच्या अट क्र. 11 चे अधीन राहून सदर्हू काम मे.ए.एस.कुळकर्णी ॲन्ड असोसिएट्स जुन्याच दरावर म्हणजे रु.550/–प्रति प्रकरण प्रमाणे करण्यास तयार असल्याने उक्त अटी नुसार प्रत्येकी रु.72.00 लक्ष प्रति वर्ष प्रमाणे चार वर्षकरिता 2.88 कोटी च्या खर्चास व सदर्हू काम चार वर्षात म्हणजे मार्च–2021 पर्यत पूर्ण करण्याच्या अटीवर संबंधीत मे.ए.एस. कुळकर्णी ॲन्ड असोसिएट्स यांना कामाच्या मुदतवाढीची व आर्थिक मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रकरणाची पडताळणी व निर्धारण लवकरात लवकर व्हावे असा स्थायी समितीचा मानस आहे त्या करीता ही पडताळणी व निर्धारण दोन वेगवेगळया कंपनीच्या माध्यमातुन करणे आवश्यक आहे करीता अतिरीक्त सनदी लेखापाल कंपनीची नियुक्ती करण्यात यावी, याचे अधिकार आयुक्तास प्रदान करण्यात येते, तसेच सन 2018–2021 पर्यंत कार्यालयाच्या सुचनेनुसार मुदतवाढीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 302:– {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 02 (क) कल्पना नगर येथे उद्यान विकसित करण्याकरिता विविध कामे करण्याचे रू. 32,32,309/– (अक्षरी बत्तीस लक्ष बत्तीस हजार तिनशे नऊ फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामाच्या निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. (सदर खर्च पद क्र. A46001673101 अंतर्गत प्रस्तावित)

ठराव क्रमांक 303:– {लोककर्म झोन 04} शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 7 येथील बाबा फरीद नगर येथे बॉक्स कल्वहर्टचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 04 निविदांपैकी निम्नतम निविदाकार में. राजेश एस. रंगारी हयांची प्राकलनीय दरापेक्षा 16.25 टक्के कमी दराची निविदा रूपये 33,55,519/– स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 304:– {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 02 (अ) अंतर्गत डॉ. आंबेडकर कॉलोनी येथील रोडचे सिमेंटीकरण करण्याच्या कामाकरिता रू. 29,99,610/– रकमेच्या प्राकलनास मान्यता प्रदान करुन निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 305:– {स्लम विभाग} प्रभाग क्र. 18 'अ' अंतर्गत महाल शिगाडा मार्केट येथे संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. २८,५४,४४१/– (अठ्ठावीस लक्ष, चौपन हजार, चारशे एक्केचाळीस फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 306:— प्रभाग क्र. २९ (क) अंतर्गत निलकमल नगर नरसाळा {लोककर्म झोन 3} येथे सिमेंट कॉंक्रिट रोडचे बांधकाम करण्यास्तव रू. ४१,५१,६७६/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A42001374602 अंतर्गत तरतुद मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलाविण्याचा अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 307:— रेशिमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृहाकरिता शासन {लोककर्म विभाग} निर्णय दिनांक ०६ मार्च, २०१७ अन्वये मुलभूत सुविधांचा विकास या योजनेतंर्गत शासनाकडून या प्रकल्पाकरिता रू. ७७.८५ कोटी उपलब्ध करून देण्यास्तव मान्यता प्राप्त आहे. हे सभागृह अंतराष्ट्रीय दर्जाचे असावे यास्तव वेळोवेळी प्राप्त सूचनांनुसार काही तांत्रिक बाबींमध्ये बदल तथा अतिरिक्त बाबीं समाविष्ट झाल्याने या प्रकल्पाची एकूण सुधारित राशी रू. ८४.९९ कोटी झाली आहे. त्यानुषंगाने पुढील प्रमाणे मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

१. प्रस्तुत प्रकल्पाचा रू. ८४.९९ कोटी रकमेच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
२. या प्रकल्पातंर्गतील समाविष्ट सभागृहाचे अंतर्गत सजावट, मंचावरील सजावट, कॅनरा लाईटींग व्यवस्था, अकॉस्टीक्स्, आसन व्यवस्था, विद्युत ठराव क कामे, वातानुकुलीत व्यवस्था, लिफ्ट व्यवस्था, अग्निशमन ठराव क कामे, परिसर विकास व अतिरिक्त कामे जसे— प्रसाधनगृहात उच्चतम दर्जाचे सेंसरसह सॅनिटरी फिटींग, डोरमा पार्टीशन, तळमजल्यावर उपहारगृहाची निर्मिती, पेंटीग म्युरल व आर्ट म्युरलची कामे, सभागृहाच्या वींगस् मधील खिडक्यांना ॲल्युमिनीअम लोअर्स लावणे,सभागृहाच्या पहिल्या मजल्यावर व बालकनी मजल्यावर अतिरिक्त कॅफेट एरिया काऊंटर तयार करणे इ. कामांचे रू. ४५,८७,९४,७४७/— चे सुधारित प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
३. वरील अ..क्र. २ मध्ये नमूद कामाकरिता स्थायी समिती ठराव क्र. ६०३ दि. १७. १०.२०१६ अन्वये रू. ३१,३७,४७,४२५/— राशीचे मे. सुपर कंस्ट्रक्शन कंपनी यांना कार्यादेश निर्गमित करण्यात आलेला आहे. अतिरिक्त बाबींमुळे कामाचे व्याप्ती वाढल्याने, सुधारित रू. ४५,८७,१४,७४७/— राशीचे प्राकलना नुसार मे. सुपर कंस्ट्रक्शन कंपनी हयांना त्यांचे मंजुर देकारा नुसार उर्वरित रकमेचा वाढीव कार्योत्तर कार्यादेश (Extended work Order to Original Work Order) देण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 308 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

स्थायी समिती सभा ठराव /ठराव क्र. दि. 29.11.2017 (उपसमितीचा अहवाल व परिशिष्ट 'अ')